77A

(30)

# सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पालघर

पत्ता:- मच्छिमार संघाची इमारत, पहिला मजला, माहिम रोड, पालघर(प.) ४०१४०४
दूरध्वनी क्रं:- ०२५२५-२५२६६५ इ-मेल- arpalghar@yahoo.in

जा.क्र.सनिपा/बी.३/विजयनगर हौ./७७(अ)/ ६६ /२०१८ दिनांक:- २३/०१/२०१८

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) अन्वये आदेश**

**वाचावे :-** १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ)
२) संस्थेच्या सभासदांचा दि. १५/११/२०१७ चा तक्रार अर्ज
३) या कार्यालयाने कायदा कलम ७७(अ) अन्वये दिं. २०/११/२०१७ रोजी निर्गमित केलेली नोटीस

ज्याअर्थी **विजयनगर को. ऑप. हौसिंग सोसायटी लि. माहिम रोड, पालघर, ता.जि. पालघर,** ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतूदीनुसार नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था असून ती या कार्यालयाच्या अखत्यारीत येत आहे. आणि,

ज्याअर्थी नोंदणीकृत सहकारी संस्थेचे कामकाज कायदा कलम, नियम व मंजूर उपविधीनूसार चालविणे संस्थेच्या व्यवस्थापक समितीवर बंधनकारक आहे आणि,

ज्याअर्थी संस्थेच्या संचालक मंडळाचा कार्यकाळ संपलेला आहे. संस्थेचे सभासद नसताना स्वतःच्या अधिकारात सचिव पद स्विकारुन श्री. अरविंद काशिनाथ पाटील यांनी मनमानी करुन संस्थेचे व सभासदांचे आर्थिक नुकसान केले आहे व करीत आहे. सुमारे ६ महिन्यापासून संस्थेचा व्यवहार ठप्प झालेला आहे. असे उपरोक्त संदर्भ क्रमांक २ च्या अर्जान्वये या कार्यालयास कळविले आहे. व संस्थेवर प्रशासक मंडळाची नियुक्ती करुन पाच वर्षाकरीता निवडणुक प्रक्रिया आदेश उपविधी नूसार घेण्याची विनंती केली आहे आणि,

ज्याअर्थी, संस्थेच्या सचिवांना संदर्भ क्र. ३ अन्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) अन्वये नोटीस देवून आपले लेखी /तोंडी म्हणणे सादर करणेबाबत दि. ११.१२.२०१७, दि. २६.१२.२०१७, ०८.०१.२०१८, दि. १५.०१.२०१८ व दि. २२.०१.२०१८ रोजी सुनावण्या घेण्यांत आल्या, मात्र सदर सुनावणीस हजर राहून संस्थेने त्यांचा लेखी/ तोंडी खुलासा सादर केलेला नाही.

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ (१)आय नूसार समितीची मुदत संपण्यापुर्वी कलम ७३ क ब च्या पोट कलम(१४) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे तीची निवडणुक घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाला कळविणे हे संस्थेचे कर्तव्य असेल (२) समितीने तीची निवडणुक घेण्यासंबंधात पोटकलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाला कळविण्यास बुध्दीपुरस्सर कसूर केली असेल तर, आणि त्यामुळे कोणत्याही कारणास्तव, मुदत संपण्यापुर्वी समितीची निवडणुक घेता आली नसेल तर, समितीचे सदस्य त्यांचे अधिकारपद धारण करण्याचे बंद करतील आणि अशा परिस्थित निबंधक अधिनियमाच्या कलम ७७ अ अन्वये योजिल्याप्रमाणे कारवाई करील आणि,

त्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

## आ दे श

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये प्राप्त अधिकारानूसार मी सुरेश अंधारे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पालघर, सदर आदेशान्वये **विजयनगर को. ऑप. हौसिंग सोसायटी लि. माहिम रोड, पालघर, ता.जि. पालघर,** या संस्थेच्या समितीची निवडणुक घेवून नवीन समिती गठीत होईपर्यंत संस्थेचे कामकाज पाहण्यांसाठी खालील प्रमाणे प्राधिकृत अधिकारी नियुक्ती करीत आहे. प्राधिकृत अधिकाऱ्यांनी कायदयातील तरतूदी नुसार ६ महिन्यांचे कालावधीत संस्थेची निवडणुक घेऊन नवनियुक्त समितीकडे पदभार देऊन तसा अहवाल सादर करावा.

१. श्री.व्ही.के.संखे, सेवानिवृत्त सहाय्यक निबंधक

सदरचा आदेश आज दि. २३/०१/२०१८ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी निर्गमित करीत आहे.

स्थळ:- पालघर

दिनांक:- २३/०१/२०१८

(सुरेश अंधारे)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,पालघर.

प्रति,

१. श्री. व्ही.के.संखे, सेवानिवृत्त सहाय्यक निबंधक

प्राधिकृत अधिकारी

२) **सचिव, श्री. अरविंद काशिनाथ पाटील, विजयनगर को. ऑप. हौसिंग सोसायटी लि. माहिम रोड, पालघर, ता.जि. पालघर,**

२/- त्यांना कळविणेत येते की संस्थेच्या दप्तराचा ताबा प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे देऊन तसा अहवाल या कार्यालयात सादर करावा.

३) शाखाधिकारी ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा- पालघर

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,पालघर

05/02/2018
11-15
सचिव